सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २८८ | शुक्रवार, दि. १० जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १४३००० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १३१५०० |
| १८ सोने ७५.००% | ₹ १०९००० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २३००/- |

भाव प्रती १० ग्रॅम





सौ. मनीषाताई कागणे
अमळनेर


श्री. राहुल महाजन
अमळनेर


श्री. पारसमल ललवाणी
अमळनेर


श्री. विजय पाटील
अमळनेर


श्री. अंबरीश कळवे गुरुजी
अमळनेर


श्री. अनिल महाजन
अमळनेर

माझी बदली होताच मुलगा दोन प्रश्न विचारतो! -पान २

# अमळनेर बाजार समितीत दीड कोटीचे शेतकरी भवन

## शासनाकडून प्रशासकीय मान्यता; ७५ लाख रुपये अनुदान मिळणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन' उभारण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक कोटी ५० लाख ३६ हजार ७८८ रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने बुधवार, दि. ८ जुलै २०२६ रोजी यासंदर्भात शासन निर्णय प्रसिद्ध केला असून, या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित शेतकरी भवन उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे.



राज्यातील ज्या कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकरी भवन उपलब्ध नाही किंवा विद्यमान इमारती जीर्ण अवस्थेत आहेत अशा ठिकाणी 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन' उभारण्याची योजना शासनाने राबविली आहे. या योजनेंतर्गत येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

शासन निर्णयानुसार या प्रकल्पासाठी ७५.१८ लाख (५० टक्के) शासन अनुदान दोन समान टप्प्यांत वितरीत केले जाणार आहे. उर्वरित निधी बाजार समितीस स्वनिधी अथवा कर्जाच्या माध्यमातून उपलब्ध करून द्यावा लागणार आहे. तसेच निविदा प्रक्रियेनंतर मंजूर होणारी रक्कम प्रशासकीय मंजुरीपेक्षा कमी असल्यास त्याच मंजूर निविदा रकमेच्या ५० टक्के इतकेच शासन अनुदान देण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

शेतकरी भवनाच्या बांधकामापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंता (स्थापत्य) यांच्याकडून तांत्रिक मान्यता घेणे बंधनकारक राहणार आहे. त्यानंतरच विहीत कार्यपद्धतीनुसार निविदा प्रक्रिया राबवून कार्यारंभ आदेश दिले जाणार आहेत. तसेच बाजार समितीच्या सचिवांनी बांधकामाचा प्रगती अहवाल वेळोवेळी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव यांच्याकडे सादर करावा, असेही शासनाने निर्देशित केले आहे.

प्रशासकीय मान्यता मिळाल्यापासून एका वर्षाच्या आत हे बांधकाम पूर्ण करण्याचे बंधन बाजार समितीवर घालण्यात आले आहे. याशिवाय शेतकरी भवनाचा दैनंदिन खर्च, देखभाल-दुरुस्ती, वीज, पाणी, मनुष्यबळ तसेच इतर सर्व खर्च संबंधित बाजार समितीलाच करावा लागणार असून, त्यासाठी शासनाकडून कोणताही अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाणार नसल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवनासोबत शेतकऱ्यांना नाममात्र पाच रुपयांत जेवणाची सोय देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील मोजक्याच बाजार समित्यांना सदरचे शेतकरी भवन मंजूर झाले असून, त्यात अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समितीला पणनमंत्री ना. जयकुमार रावल यांच्या विशेष सहकाऱ्याने हा लाभ मिळाला आहे. तर खासदार स्मिताताई वाघ यांच्यासह आमदार अनिलदादा पाटील यांच्या विशेष प्रयत्नांनी सदर भवन अमळनेर बाजार समितीत निर्माण होणार आहे. यासाठी सभापती अशोक पाटील, उपसभापती सुरेश पाटील व संचालक मंडळाने बाजार समितीला मिळालेल्या या शेतकरी भवनासाठी शासनाचे आभार मानले आहेत.



'शेतकरी भवन'साठी तीन वर्षांपासून पाठपुरावा सुरू होता. त्यास यश आल्याचे समाधान आहे. या नवीन दीड कोटीच्या शेतकरी भवनामुळे बाजार समितीत शेतीमाल विक्रीसाठी येणाऱ्या गोरगरीब, कष्टकरी, सामान्य शेतकरी पुरुष, महिलांना मुक्काम, विश्रांतीची सोय तसेच आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध होणार आहेत. सोबतच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भोजन व्यवस्था असणार असून, त्यात ४० रुपये शासन अनुदान व ५ रुपये बाजार समितीचा प्रतिव्यक्ती खर्च असेल. सदर भोजन हे शेतकऱ्याला नाममात्र ५ रुपयांत मिळेल. त्यामुळे अमळनेरसह परिसरातील हजारो शेतकऱ्यांसाठी ही सुविधा मोठा दिलासा ठरणार असून, सोबत हमाल-मापाडींसाठीही यात एक भवन असेल. कष्टकरी शेतकऱ्यांना दिलेल्या शब्द पूर्ण होत असल्याचे समाधान आहे. यासाठी पणनमंत्री ना. जयकुमार रावल, खासदार स्मिताताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील यांची मोलाची मदत व सहकार्य यासाठी लाभले.

– **अशोक आधार पाटील**, सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, अमळनेर.





**अमळनेर : 'एलसीबी'ने उघडकीस आणलेल्या गोवंश कत्तल प्रकरणाचा पर्दाफाश करून यातील मुख्य सूत्रधार, आर्थिक लाभार्थी, वाहतूक साखळी व सर्व संबंधितांना कायद्याच्या कक्षेत आणण्याच्या मागणीसाठी गुरुवार, दि. ९ जुलै रोजी तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, पोलीस निरीक्षक निकम व मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना निवेदन देताना येथील प्रखंड अध्यक्ष डॉ. संजय शाह, प्रखंड मंत्री सचिन चौधरी, प्रखंड संयोजक सचिन महाजन, विजय पाटील यांच्यासह विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते.**

# 'एलसीबी'च्या कारवाईनंतरही अनेक प्रश्न अनुत्तरीतच!

## गोवंश कत्तल प्रकरणात रॅकेटचा पर्दाफाश करण्याची 'विहिंप', बजरंग दलाची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात शुक्रवार, दि. ३ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) उघडकीस आणलेल्या कथित बेकायदेशीर गोवंश कत्तल प्रकरणात अद्यापही अनेक गंभीर प्रश्न अनुत्तरीत आहेत, असा आरोप करत विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलीस निरीक्षक, मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांना सविस्तर निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की गोवंश कत्तल प्रकरणात केवळ घटनास्थळी उपस्थित व्यक्तींवर कारवाई करून प्रकरण संपविण्याऐवजी संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश करून या व्यवसायामागील मुख्य सूत्रधार, आर्थिक लाभार्थी, वाहतूक साखळी व संबंधित सर्व व्यक्तींना कायद्याच्या कक्षेत आणावे.

### मोठ्या प्रमाणात कातड्यांचा साठा

ज्या ठिकाणाहून तीन जीवंत गोवंशांची सुटका करण्यात आली त्याच परिसरात मोठ्या प्रमाणात गोवंशांच्या कातड्यांचा साठा आढळल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कातड्यांचा स्वतंत्र पंचनामा करून जप्ती करावी. तसेच त्यांचा उगम, वाहतूक, साठवणूक व संबंधित व्यक्तींची चौकशी करून स्वतंत्र गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

### पालिकेच्या कत्तलखान्याचीही चौकशीची मागणी

पालिकेच्या अधिकृत कत्तलखान्यात परवानगीच्या अटींचे उल्लंघन करून गोवंशाची कत्तल होत असल्याच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी व्हावी. आरोप सिद्ध झाल्यास संबंधित कत्तलखाना, जबाबदार अधिकारी, पशुवैद्यकीय अधिकारी व संबंधित व्यक्तींवर तत्काळ निलंबनासह कठोर कारवाई करावी. तसेच कत्तलखान्यात कोणत्या प्राण्यांच्या कत्तलीला परवानगी आहे, प्रत्यक्षात कोणत्या प्राण्यांची कत्तल केली जाते, त्याच्या नोंदी, तपासणी व देखरेख यांचीही सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### तपासाबाबत उपस्थित गंभीर प्रश्न

या प्रकरणाच्या तपासासंदर्भात विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाने प्रशासनासमोर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. यामध्ये 'एलसीबी'ने धडक कारवाई करून गुन्हा उघडकीस आणल्यानंतर पुढील तपास स्थानिक पोलिसांकडे का वर्ग करण्यात आला? 'एलसीबी' स्वतः या प्रकरणाचा पुढील तपास करू शकत नव्हती का? तसे नसल्यास त्यामागील कारणे काय? घटनास्थळी ताब्यात घेण्यात आलेल्या व्यक्ती आणि नंतर दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीतील आरोपींच्या नावांमध्ये बदल का झाला? घटनास्थळी आढळून आलेल्या इतर संशयित आरोपींना अटक करण्याऐवजी त्यांना 'फरार' का दाखविण्यात आले? या संपूर्ण प्रकरणातील मुख्य सूत्रधाराचा शोध घेण्यात दिरंगाई का होत आहे? मुख्य सूत्रधाराला वाचविण्याचा अथवा पाठीशी घालण्याचा प्रयत्न होत आहे का? या बाबींची वरिष्ठ स्तरावर निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

### कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन

प्रशासनाने तातडीने प्रभावी कारवाई केली नाही, चौकशीत दिरंगाई झाली किंवा दोषींना संरक्षण देण्याचा प्रयत्न झाल्याचे आढळल्यास विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांच्या वतीने जनआक्रोश मोर्चा, आमरण उपोषण तसेच लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

### एक हजाराहून अधिक नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांसह निवेदन

निवेदन देतेवेळी प्रखंड अध्यक्ष डॉ. संजय शाह, प्रखंड मंत्री सचिन चौधरी, प्रखंड संयोजक सचिन महाजन, विजय पाटील यांच्यासह विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच एक हजाराहून अधिक हिंदुत्वनिष्ठ नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांसह प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले.

# अमळनेर तालुक्यात ३७ तीव्र, २१४ मध्यम कुपोषित बालके

## पोषण आहार, नियमित आरोग्य सेवेसाठी महिला व बालविकास विभागाची मोहीम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यात जून २०२६ मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणात ३७ तीव्र कुपोषित आणि २१४ मध्यम कुपोषित बालके आढळून आली आहेत. ही बाब चिंताजनक असली, तरी या बालकांना वेळेवर उपचार, पोषण आहार आणि नियमित आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महिला व बालविकास विभाग तसेच आरोग्य विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे.



महिला व बालविकास विभागाच्या ताज्या सर्वेक्षणानुसार तालुक्यातील अंगणवाड्यांमधून कुपोषित बालकांची ओळख करून त्यांचे नियमित वजन, उंची आणि आरोग्य तपासणी केली जात आहे. कुपोषणाची तीव्रता लक्षात घेऊन बालकांच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. तीव्र कुपोषित बालकांना आवश्यकतेनुसार पोषण पुनर्वसन केंद्रात दाखल करून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार केले जात आहेत. याशिवाय त्यांना विशेष पोषण आहार उपलब्ध करून दिला जात आहे. मध्यम कुपोषित बालकांसाठीही स्वतंत्र नियोजन करण्यात आले असून त्यांच्या पालकांना सकस आहार, स्तनपानाचे महत्त्व, पूरक आहार आणि स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले जात आहे.

कुपोषणमुक्त अमळनेरचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचारी यांच्या माध्यमातून घरोघरी भेटी देऊन बालकांच्या आरोग्याची माहिती घेतली जात आहे. बालकांच्या वाढीची नियमित नोंद ठेवून आवश्यक त्या ठिकाणी तातडीने उपचार आणि पोषण सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. प्रशासनाने कुपोषित बालकांच्या कुटुंबांमध्ये पोषणविषयक जनजागृतीवरही भर दिला असून संतुलित आहार, स्वच्छता आणि बालसंगोपनाबाबत सातत्याने मार्गदर्शन केले जात आहे. संबंधित विभागांच्या समन्वयातून कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

कुपोषित बालकांची नियमित आरोग्य तपासणी, वजन नोंदणी आणि पोषण आहारावर विशेष भर दिला जात आहे. तीव्र कुपोषित बालकांना तातडीने उपचार व आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असून, पालकांमध्ये पोषणाबाबत जनजागृतीही केली जात आहे. कुपोषणमुक्त अमळनेरसाठी सर्व यंत्रणा समन्वयाने काम करत आहेत.

– **सौ. प्रमिलाताई पाटील,** महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी, अमळनेर.

# बालकास नाल्यात फेकल्याप्रकरणी महिलेस तीन वर्षे कारावासाची शिक्षा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नवजात बालकास नाल्यात फेकल्याप्रकरणी चोपडा तालुक्यातील महिलेस अमळनेर जिल्हा व सत्र न्यायालयाने तीन वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश सौ. छायाताई पाटील यांनी हा निकाल दिला. ही घटना ६ ऑगस्ट २०२२ रोजी घडली होती. गावात उत्तरकार्याचा कार्यक्रम सुरू असताना काही नागरिकांना नाल्याकडून नवजात बालकाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. त्यांनी तातडीने गावातील पोलीसपाटलाला याची माहिती दिली. पोलीसपाटलाने नाल्यात पडलेल्या नवजात बालकास बाहेर काढून कापडात गुंडाळले आणि उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल केले. त्यामुळे बालकाचा जीव वाचला.

(पान २ वर)

# दरसूचीनुसार दोनशे कोटींचा प्रलंबित विकास आराखडा मंजूर करा

**संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थान**

## माजी आमदार कृषिभूषण साहेबराव पाटील यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील संत श्री सखाराम महाराज समाधी स्थळ आणि विठ्ठल-रुक्मिणी संस्थानासाठी २०१४-१५ मध्ये तत्कालीन अर्थमंत्र्यांनी ५० कोटींची मान्यता मिळूनही निधी उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे आता सन २०२५-२६ च्या दरसूचीनुसार दोनशे कोटींचा प्रलंबित विकास आराखडा मंजूर करण्यात यावा, अशी मागणी माजी आमदार कृषिभूषण साहेबराव पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. दरम्यान, या मंदिराचे स्ट्रक्चरल आणि फायर ऑडिट करण्यात आले असून, अहवाल येणे अद्याप बाकी आहे.



येथील बोरी नदीकाठी १८१६ मध्ये विठ्ठल-रुक्मिणी मंदिराची स्थापना करण्यात आली होती. संत श्री सखाराम महाराजांच्या वास्तव्यामुळे आणि १८१६ पासूनच्या अखंड वारीमुळे अमळनेर पुण्यभूमी म्हणून व प्रतिपंढरपूर तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रासह विविध परिसरातून लाखो भाविक भेट देण्यासाठी येथे येत असतात. अमळनेरमधून मध्य प्रदेश व महाराष्ट्र यांना जोडणारा राज्यमार्ग जातो तसेच शहरात ऐतिहासिक दगडी दरवाजा (वेस). प्रसिद्ध अंबऋषी मंदिर, वर्णेश्वर, खळेश्वर, खार्टेश्वर महादेव मंदिर, जैन मंदिर, श्री मंगळग्रह मंदिर, भूमाता मंदिर, डुबकी मारुती, क्रांतीपर्व, शहीद स्मारके, शनैश्वर मंदिर अशी देवस्थाने, भारतातील एक तत्त्वज्ञान केंद्र, विविध शाळा, प्रताप कॉलेज, सुप्रसिद्ध विप्रो कंपनी, साने गुरुजींचे वास्तव्य होते. एवढ्या मोठ्या प्रमाणात वारसा लाभलेल्या दिग्गजांच्या पावनभूमीत भौगोलिक विपुलता असूनही तीर्थक्षेत्राचा व पर्यटन विकासाला चालना मिळालेली नाही.

एक जुलै रोजी विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास आग लागल्याने कोट्यवधींचे नुकसान झाले आहे. २०१४ च्या ५० कोटी रुपयांच्या प्रलंबित विकास आराखड्याला दोनशे कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देऊन निधी द्यावा.

दरम्यान, जळगाव येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे मंदिराचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून, मालेगाव येथील अग्नीशमन अधिकाऱ्यांनी फायर ऑडिट केले आहे. त्यांचा अहवाल अद्याप येणे बाकी आहे.

## संपादकीय

# भेसळखोरांना अद्दल घडवा

भारतातील दुधाची भेसळ थांबवली नाही, तर पुढील पिढ्यांचे आरोग्य धोक्यात येईल, असा इशारा पूर्वीच जागतिक आरोग्य संघटनेनेही दिला आहे. धडाकेबाज प्रशासकीय अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली अन्न व औषध प्रशासनाने राज्यभरात सुरू केलेल्या कारवायांच्या धडाक्यामुळे दुधापासून पनीरपर्यंत आणि 'एनर्जी ड्रिंक'पासून सौंदर्य प्रसाधनांपर्यंत अनेक जिन्नसांमधील भेसळीचे प्रकार उघडकीस येत आहेत. एखाद्या अधिकाऱ्याने पुढाकार घेतल्यावर महिन्या-दोन महिन्यांतच इतक्या मोठ्या प्रमाणात गैरप्रकार आढळून येत असतील, तर भेसळ करणाऱ्या माफियांच्या अधोविश्वाची पाळेमुळे किती खोलवर रुजली आहेत, याची कल्पना यावी. विशेषतः पुण्यासह सात जिल्ह्यांमध्ये शाम्पू आणि अत्यंत घातक औद्योगिक रसायनांची दुधात भेसळ करणारी संघटित टोळी उघडकीस आली आहे. कधी काळी शेतकऱ्यांना गाय-म्हैसपालनास प्रोत्साहन देऊन 'दुधाचा महापूर' आणल्यामुळे साऱ्या देशात अभिमानाने उंचावलेली महाराष्ट्राची मान या दूधभेसळीमुळे शरमेने खाली झुकली आहे. घराघरांतल्या लहानग्यांना भेसळयुक्त दुधातून एकप्रकारे विषच पाजणाऱ्या या हैवानांना शिक्षा करण्यासाठी कायद्यातील कलमेही अपुरी ठरावीत! इतकी वर्षे भेसळीची समांतर व्यवस्था चालवणाऱ्या या माफियांना कठोर शिक्षा झालीच पाहिजे; त्याबरोबरच या कृत्यांना आशीर्वाद देणारे सरकारी बाबू आणि पांघरूण घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या बड्या धेंडांनाही जन्माची अद्दल घडायला हवी.

मुंढे यांची कार्यशैली आणि कायदे-नियमांबाबत तडजोड न करण्याच्या भूमिकेमुळे आजवरच्या २१ वर्षांच्या प्रशासकीय सेवेत त्यांच्या २५ वेळा बदल्या झाल्या असल्या, तरी कायदेभंगाविरोधात कारवायांचा त्यांचा पवित्रा कायम आहे. दोन महिन्यांपूर्वी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी त्यांची नियुक्ती झाली, तेव्हापासून त्यांनी भेसळखोरांच्या विरोधात बडगा उगारला आहे. विविध अन्नपदार्थ, औषधे आणि सौंदर्य प्रसाधनांमधील भेसळीचे अनेक प्रकार उघडकीस येऊ लागले आहेत. विभागाच्या धडक कारवायांनंतर दुकाने-हॉटेलांमध्ये विकल्या जाणाऱ्या पनीरची तपासणीही बंधनकारक झाली आहे. अनेक तीर्थक्षेत्रांवर प्रसाद म्हणून विक्री होणाऱ्या पेढे व मिठाईतही भेसळ होत असल्याचे उघड झाले. मात्र, पुणे जिल्ह्यातील मंचरमधून सोलापूर, अहिल्यानगर, जालना, ठाणे, जळगाव आणि धाराशिव अशा सात जिल्ह्यांमध्ये प्राणघातक रसायनांची भेसळ करणारी टोळी, हा दुधात भेसळीचा राज्यातील आजवरचा उघडकीस आलेला सर्वांत मोठा गुन्हा ठरावा. शाम्पू, डिटर्जंट, पाम तेल यांसह अनेक प्राणघातक औद्योगिक रसायने मिसळून फक्त भेसळ नव्हे; तर संपूर्ण बनावट दूधच ही टोळी तयार करीत असे. दूध संकलन केंद्रे आणि शीतकरण केंद्रांबरोबरच गावोगावच्या दूध उत्पादक शेतकऱ्यांशी संपर्क साधून हे साहित्य आणि भेसळीसाठी 'मार्गदर्शन' करून त्यांनाही या गुन्ह्यांसाठी प्रवृत्त करण्याचा या टोळीचा कावा, हे या घटनेतील सर्वांत समाजविघातक कृत्य मानले पाहिजे. काही ठिकाणी तर किराणा दुकानांमधूनही या भेसळसाहित्याची राजरोस विक्री होत असे. अशा विषाचे उत्पादन आणि वितरणाची इतकी संघटित साखळी उभी राहीपर्यंत एकाही यंत्रणेला याची कल्पना येऊ नये, ही संतापाची बाब आहे.

लाखो बालकांचे अन्न असलेले दूध सर्वसामान्यांना उपलब्ध करून देण्यासाठी सरकार आणि अनेक धुरिणांनी सहकाराच्या माध्यमातून कष्टाने उभ्या केलेल्या या क्षेत्रास काळिमा फासणाऱ्या आणि नागरिकांचे जीव धोक्यात घालून खिसे भरणाऱ्या काही निवडक भेसळखोरांची गय केली जाऊ नये. मुंढे यांनी सूत्रे स्वीकारल्यापासून दीड-दोन महिन्यांतच विभागाने सुमारे नऊशे ठिकाणी छापे घातले. अन्न व औषध प्रशासनासह अशा टोळ्या उद्ध्वस्त करणारे पोलिसही अभिनंदनास पात्र आहेत. मात्र, अनेकदा अधिकारी बदलले की त्याने पुढाकाराने सुरू केलेल्या कारवाया थंड पडतात आणि पुन्हा चोरपावलांनी गैरप्रकार सुरू होतात; पुढे या चोरवाटाच राजमार्ग बनतात, असे पूर्वानुभव आहेत. त्यामुळे कायदेपालन हा एखाद्या अधिकाऱ्यापुरता अपवाद न ठरता ती व्यवस्थेची कार्यसंस्कृती बनली पाहिजे. मुंढे यांच्या बदलीच्या प्रयत्नांवरून विधिमंडळात झालेल्या चर्चेमध्ये सरकारने 'त्यांची बदली होणार नाही,' अशी हमी दिली आहे. आता भेसळखोरांच्या विरोधातील लढाईत सरकार त्यांच्या पाठीशी राहील आणि त्यात राजकीय हस्तक्षेप होऊ न देता अशा अधिकाऱ्यांना कायद्याच्या चौकटीत पुरेशी स्वायत्तताही दिली जाईल, अशी अपेक्षा चुकीची ठरू नये.

## वर्षाव शुभेच्छांचा...!





अमळनेर : येथील धुळे रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरासमोरील 'आराध्या खमण हाऊस' व 'आमरस भंडार'च्या शुभारंभ सोहळ्याप्रसंगी गुरुवार, दि. १० जुलै रोजी संचालक हर्षद पाटील व त्यांच्या पत्नी सौ. वेदांगी पाटील यांना दै. 'ग्लोबल महातेज' परिवारातर्फे 'मंगलमय' शुभेच्छा देताना कार्यकारी संपादक भरत पाटील, मार्केटिंग मॅनेजर शरद कुलकर्णी व संजय सोनवणे. दुसऱ्या छायाचित्रात संचालक हर्षद पाटील व परिवारावर शुभेच्छांचा वर्षाव करण्यासाठी केलेली अमळनेरकरांची गर्दी.

# अमळनेर न्यायालय आवाराबाहेरील अतिक्रमणे पालिकेने अखेर हटवली

## जिल्हा सत्र न्यायालयाच्या आदेशानंतर मुख्याधिकाऱ्यांनीही दिला आदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : न्यायालयाच्या निर्देशानुसार अमळनेर न्यायालयाच्या आवाराबाहेर असलेली अतिक्रमणे येथील पालिकेने हटवली आहेत. अमळनेर न्यायालयाबाहेर आणि बाजूला टपरीधारक, डिजिटल बॅनर साहित्य, कपडे विक्रेते, पाणीपुरी विक्रेते, बॅग, चप्पल विक्रेते यांनी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केल्याने त्यांच्या ग्राहकांच्या मोटारसायकलींमुळे रस्ता व्यापला जाऊन वाहतुकीची कोंडी होत होती. अनेकदा खाद्यपदार्थ दुकानांवर वादही झाले होते. हळूहळू ज्याला वाटेल तो न्यायालयाबाहेर व्यवसाय करायला सुरूवात करत होता. अखेर जिल्हा व सत्र न्यायालय, जळगाव यांनी न्यायालयाबाहेरील अतिक्रमणे काढण्याचे आदेश दिले. त्यानुसार जूनमध्ये याबाबत दिवाणी न्यायाधीश यांनी पालिकेला पत्र दिले. परंतु पालिकेने याकडे दुर्लक्ष केले होते. अखेर जिल्हा न्यायाधीश १ व अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश छा. वा. पाटील यांनी नगरपालिकेला पत्र दिले आणि मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी तातडीने अतिक्रमण विभागाला सदर अतिक्रमण हटविण्याचे आदेश दिले. अतिक्रमण विभागप्रमुख राधेश्याम अग्रवाल व संजू बिऱ्हाडे, अविनाश बिऱ्हाडे, राज रामराजे, विशाल सपकाळे, दर्शन बिऱ्हाडे या कर्मचाऱ्यांनी न्यायालयाबाहेर रस्त्यावरील टपऱ्या, किरकोळ अतिक्रमण, हातगाड्या, तात्पुरते व्यवसायिक असे सर्व अतिक्रमण हटविले.



*अमळनेर : न्यायालय आवाराबाहेरील अतिक्रमणे हटविण्यासंदर्भात जिल्हा सत्र न्यायालयाच्या आदेशानंतर पालिका मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनीही अतिक्रमण निर्मूलन विभागाला आदेश दिल्यानंतर करण्यात आलेली अतिक्रमण हटविण्याची कारवाई.*

दरम्यान, अतिक्रमण हटविताना काही नगरसेवकांनी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. मात्र, न्यायालयाचा आदेश पाहून त्यांनी माघार घेतली. यामुळे न्यायालयाबाहेरील रस्ता आता मोकळा झाला आहे. तथापि, प्रत्येक शासकीय कार्यालयाबाहेर अतिक्रमण वाढले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य मार्गांवर अतिक्रमण आहे, बोरी नदीपुलावर अतिक्रमण आहे; परंतु प्रशासनाला जनहिताचे सोयरसुतक नाही, लोकप्रतिनिधी सर्रास दुर्लक्ष करीत आहेत. तर नगरसेवक अतिक्रमण वाढविण्यात रस घेत आहेत. यामुळे नागरिकांची कोंडी होऊन त्यांना त्रास भोगावा लागत आहे. अतिक्रमणविरोधी पथकावर दबाव आणून त्यांनाच दोषी धरले जात आहे. म्हणून नगरसेवकांनी हस्तक्षेप थांबवून पालिका प्रशासनने अतिक्रमण हटाव मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. ▲

## दहिवदजवळ भरधाव दुचाकीची बसला धडक; दुचाकीस्वार जखमी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : तालुक्यातील दहिवद गावाजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीची महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसला धडक बसल्याने दुचाकीस्वार जखमी झाला. ही घटना सोमवार, दि. ६ जुलै रोजी रात्री घडली. या प्रकरणी बसचालकाच्या फिर्यादीवरून संबंधित दुचाकी चालकाविरुद्ध अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एसटी बसचालक विजय पाटील ६ जुलै रोजी सायंकाळी जळगाव येथून एसटी बस घेऊन गांधली येथे मुक्कामासाठी निघाले होते. रात्री सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास बस दहिवद येथील आश्रमशाळेजवळ पोहोचली. यावेळी बस रस्त्याच्या डाव्या बाजूने संतुलित वेगाने जात असताना मागून भरधाव आलेल्या हीरो एचएफ डिलक्स (एमएच १८- बीएस ४७१८) या दुचाकीने बसच्या मागील बाजूस टायरजवळ जोरदार धडक दिली. धडक इतकी जोरदार होती, की दुचाकीस्वार रस्त्याच्या कडेला फेकला जाऊन जखमी झाला. जखमी अवस्थेत त्याने मोबाईलद्वारे संपर्क साधल्यानंतर काही वेळातच एक चारचाकी वाहन घटनास्थळी आले आणि त्याला उपचारासाठी घेऊन गेले.


या अपघातात एसटी बसचे किरकोळ नुकसान झाले असून, बसमधील प्रवासी सुरक्षित असल्याचे सांगण्यात आले. घटनेनंतर बसचालक विजय पाटील यांनी अमळनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून संबंधित दुचाकी चालकाविरुद्ध निष्काळजीपणे व भरधाव वाहन चालवून अपघात घडविल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा हवालदार संदेश पाटील तपास करीत आहेत. ▲

# माझी बदली होताच मुलगा दोन प्रश्न विचारतो!

## तुकाराम मुंढे वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत नेमके काय म्हणाले?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सध्या आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची संपूर्ण राज्यासह देशभर चर्चा आहे. राज्यभरात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसालाविरोधात अन्न व औषध प्रशासन (एफडीए) धडक मोहीम राबवत आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या राज्यभरातील धडाकेबाज कारवायांनी अन्नभेसळ माफियांना मोठा आळा बसला आहे. याचदरम्यान तुकाराम मुंढेंनी एका मराठी वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये त्यांनी विविध प्रश्नांची उत्तरे दिली. यामध्ये माझ्या सततच्या बदल्यांमुळे माझ्या मुलाचे मित्र झाले नाहीत. परंतु मला गोष्टीवरून सहानुभूती नको, असे तुकाराम मुंढेंनी सांगितले.



### तुकाराम मुंढे नेमके काय म्हणाले?

मुलाच्या बाबतीत असे झाले, की पाचवीपर्यंत त्याच्या सहा शाळा बदलल्या गेल्या. कारण माझ्या बदलीमुळे त्याची दरवर्षी शाळा बदलायची. म्हणजे ती अगदी सुरूवात मुंबईपासून झाली. मग सोलापूर, मग नवी मुंबई, पुणे, नाशिक, परत मुंबई. हा प्रवास त्याला करावा लागला. आणि एका ठिकाणी एकापेक्षा जास्त वर्षे कधी त्याला भेटले नाहीत. मग येथे आल्यानंतर मात्र त्याला एकाच शाळेत ठेवले. तेव्हापासून मुलगा थोडा स्थिरावला. पण मित्रपरिवार हा त्याला कधी वाढवता आला नाही. त्याचा परिणाम 'माझे मित्र नाहीत', असे तो बोलला. त्यामुळे माझी बदली ज्यावेळेस होते त्यावेळेस मुलाचा प्रश्न असा असतो, की आता तुमच्याबरोबर मला यायचेच का? परत माझी शाळा बदलायची आहे का? आणि त्यावेळेस ही कठीण परिस्थिती असते. परंतु त्याला तोंड द्यावे लागते. कारण जर भूमिका तुमची आहे, भूमिका तुम्ही घेतलेली आहे, एक रोल घेतलेला आहे आणि पब्लिक सर्व्हंट म्हणून तो जर आपल्याला तडीस न्यायचा आहे तर ते माझे दायित्व आहे. त्यामुळे मला गोष्टीवरून सहानुभूती नको, असे तुकाराम मुंढेंनी सांगितले.

### तुकाराम मुंढे यांची आतापर्यंत कोणत्या ठिकाणी बदली झाली?

**ऑगस्ट २००५ :** प्रशिक्षणार्थी, उपजिल्हाधिकारी सोलापूर, **सप्टेंबर २००७ :** उपजिल्हाधिकारी, देगलूर उपविभाग, **जानेवारी २००८ :** सीईओ, जिल्हा परिषद नागपूर, **मार्च २००९ :** आयुक्त, आदिवासी विभाग, **जुलै २००९ :** सीईओ, वाशिम, **जून २०१० :** सीईओ, कल्याण, **जून २०११ :** जिल्हाधिकारी, जालना, **सप्टेंबर २०१२ :** विक्रीकर सहआयुक्त मुंबई, **नोव्हेंबर २०१४ :** सोलापूर जिल्हाधिकारी, **मे २०१६ :** आयुक्त, नवी मुंबई महापालिका, **मार्च २०१७ :** मुख्य कार्यकारी अधिकारी, पीएमपीएल, पुणे, **फेब्रुवारी २०१८ :** आयुक्त, नाशिक महापालिका, **नोव्हेंबर २०१८ :** सहसचिव, नियोजन, **डिसेंबर २०१८ :** प्रकल्प अधिकारी, एड्स नियंत्रण, मुंबई, **जानेवारी २०२० :** आयुक्त, नागपूर महापालिका, **ऑगस्ट २०२० :** सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई, **जानेवारी २०२१ :** राष्ट्रीय मानवाधिकार आयोग भारत, **सप्टेंबर – २०२२ :** आयुक्त आरोग्य सेवा व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, २०२२ : मराठी भाषा विभाग, **जुलै २०२२ :** पशुसंवर्धन आणि दुग्ध विकास विभाग, **जून २०२४ :** विकास आयुक्त (असंघटित कामगार), **ऑगस्ट २०२५ :** सचिव, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, मंत्रालय, **मे २०२६ :** आयुक्त, अन्न व औषध प्रशासन. ▲

## बालकास नाल्यात फेकल्याप्रकरणी महिलेस तीन वर्षे कारावासाची शिक्षा

**पान १ वरून**

या घटनेनंतर चोपडा ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी सखोल तपास सुरू करत गावातील नुकत्याच प्रसूत झालेल्या आणि आरोग्य विभागाकडे नोंद असलेल्या महिलांची पडताळणी केली. तसेच आशा स्वयंसेविका आणि आरोग्य परिचारिकांच्या मदतीने गावात शोधमोहीम राबविण्यात आली. तपासादरम्यान एका महिलेची प्रसूती झाल्याची अधिकृत नोंद नसल्याचे आढळून आले. संशयाच्या आधारे तिची चौकशी करण्यात आली असता तिने नवजात बालकाला नाल्यात फेकून दिल्याची कबुली दिली. त्यानंतर संबंधित महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा खटला अमळनेर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात चालला. सरकारी पक्षातर्फे ॲड. किशोर बागूल मंगरूळकर यांनी प्रभावी युक्तिवाद केला. खटल्यादरम्यान पोलीसपाटील, आशा सेविका, डॉक्टर यांची साक्ष तसेच डीएनए अहवाल न्यायालयात सादर करण्यात आला. उपलब्ध पुरावे आणि साक्षीदारांच्या जबाबांच्या आधारे अतिरिक्त सत्र न्यायाधीश सौ. छायाताई पाटील यांनी संबंधित महिलेला दोषी ठरवत तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली.

# दोन-तीन फूट खोल खड्ड्यांमुळे मुख्य रस्ता धोकादायक

## अपघात झाल्यास ग्रामपंचायतच जबाबदार : रामेश्वर खुर्दच्या ग्रामस्थांचा आरोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील रामेश्वर खुर्द येथील मुख्य रस्त्यावर पावसामुळे दोन ते तीन फूट खोल खड्डे पडले आहेत. त्यामुळे नागरिकांच्या जीवाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. अनेक दिवसांपासून या रस्त्याची दुरवस्था कायम असूनही ग्रामविकास अधिकारी, सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. 'एखादी जीवितहानी झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?' असा संतप्त प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा भविष्यात होणाऱ्या कोणत्याही अपघातास व जीवितहानीस संबंधित ग्रामविकास अधिकारी व संपूर्ण ग्रामपंचायत प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे. ▲








अमळनेर : तालुक्यातील रामेश्वर खुर्द येथे नुकत्याच झालेल्या पावसामुळे मुख्य रस्त्यावर ठिकठिकाणी दोन ते तीन फुटांपर्यंत खोल खड्डे पडल्याने पादचाऱ्यांसह वाहन चालकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# ख्रिस्तियानो रोनाल्डो ४१ व्या वर्षीही सुपरफिट कसा?

## नाश्त्यापासून सुरू होते फिटनेसचे गुपित; डाएट प्लॅन पाहाल तर...



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पोर्तुगालचा स्टार फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो हा फिफा विश्वचषकात खेळणाऱ्या सर्वांत तरुण खेळाडूंपैकी आहे. ४१ वय असतानाही रोनाल्डो आजही फुटबॉलच्या सर्वोच्च स्तरावर खेळत आहे. २०२२ पासून तो सौदी प्रो लीगमधील अल-नासर क्लबकडून खेळत असून पोर्तुगालच्या राष्ट्रीय संघाचं नेतृत्वही करत आहे. सध्या २०२६ च्या फिफा विश्वचषकात तो पोर्तुगालचा कर्णधार म्हणून संघाची धुरा सांभाळत आहे. कारकिर्दीच्या प्रत्येक टप्प्यावर रोनाल्डोने आपल्या फिटनेस, शारीरिक तंदुरुस्ती आणि शिस्तबद्ध जीवनशैलीमुळे वेगळी ओळख निर्माण केली आहे. रोनाल्डोचा स्वतःला फिट ठेवण्यासाठी डाएट कसा असतो हे जाणून घेऊया.

मैदानावरील सातत्यपूर्ण कामगिरी आणि स्वतःला कायम सर्वोत्तम ठेवण्याच्या जिद्दीमुळे रोनाल्डो जागतिक फुटबॉलमधील सर्वात प्रेरणादायी आणि आयकॉनिक खेळाडूंपैकी एक मानला जातो. पोर्तुगालमधील मादेरा बेटावरील फुंचाल येथे जन्मलेल्या ख्रिस्तियानो रोनाल्डो आज ज्या उंचीवर पोहोचला आहे, त्यामागे अनेक वर्षांची कठोर मेहनत आणि शिस्तबद्ध जीवनशैली आहे. त्याच्या यशात दैनंदिन सवयींचाही मोठा वाटा आहे.

रोनाल्डो आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर नियमितपणे व्यायामाचे व्हिडिओ आणि फोटो शेअर करत असतो. अनेकदा त्याचा मोठा मुलगा ख्रिस्तियानो ज्युनियर आणि त्याची जोडीदार जॉर्जिना रोड्रिग्जही त्याच्यासोबत वर्कआउट करताना दिसतात. मात्र, रोनाल्डोची खरी ओळख त्याच्या अत्यंत शिस्तबद्ध आहारामुळे आहे. योग्य आहार, नियमित व्यायाम आणि फिटनेसबाबतची काटेकोर शिस्त यामुळेच तो चाळिशीनंतरही जगातील सर्वोत्तम फुटबॉलपटूंमध्ये आपलं स्थान कायम राखून आहे.

### रोनाल्डो नाश्त्याला काय खातो?

रोनाल्डोच्या दैनंदिन दिनचर्येत आहाराला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. स्नायूंची ताकद आणि शरीरयष्टी कायम राखणे हे त्याचे प्रमुख उद्दिष्ट असल्याने दिवसाची सुरूवात तो पौष्टिक नाश्त्याने करतो. त्याच्या नाश्त्यात ॲव्होकॅडो हा मुख्य घटक असतो. आरोग्यदायी फॅट्स, दीर्घकाळ ऊर्जा देण्याची क्षमता आणि हृदयाच्या आरोग्यासाठी उपयुक्त गुणधर्मांमुळे तो दररोज ॲव्होकॅडो खातो. याशिवाय कॉफी आणि अंडी हेही त्याच्या नाश्त्याचा अविभाज्य भाग आहेत. ॲंटिऑक्सिडंट्स आणि सूक्ष्म पोषकद्रव्यांनी समृद्ध असलेली कॉफी त्याला प्रशिक्षणासाठी आवश्यक ऊर्जा देते, तर उच्च दर्जाच्या प्रथिनांचा उत्तम स्रोत असलेली अंडी स्नायू मजबूत ठेवण्यास मदत करतात.

### रोनाल्डोचा दिवसभराचा आहार कसा असतो?

युव्हेंटसमध्ये खेळत असताना रोनाल्डोचा वैयक्तिक शेफ असलेल्या जॉर्जिओ बारोने यांच्या मते, - रोनाल्डो रिफाइंड साखर, दुग्धजन्य पदार्थ, ब्रेड आणि प्रक्रिया केलेले अन्न शक्यतो पूर्णपणे टाळतो. त्याऐवजी तो दिवसातून पाच ते सहा वेळा कमी प्रक्रियायुक्त, ताजे आणि प्रथिनयुक्त अन्न खातो. त्याच्यासाठी योग्य आहाराइतकीच पुरेशी विश्रांती, शरीरातील पाण्याचे संतुलन आणि नियमित व्यायाम यांनाही समान महत्त्व आहे. फिटनेसबाबतची ही कठोर शिस्तच रोनाल्डोला या वयात सर्वोच्च स्तरावर खेळण्यास मदत करत आहे.

### दुपारच्या व रात्रीच्या जेवणात रोनाल्डो कोणते पदार्थ खातो?

दुपारचे आणि रात्रीचे जेवणही रोनाल्डो अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने घेतो. त्याच्या आहारात मासे, चिकन, गोमांस, अंडी, ॲव्होकॅडो, भात आणि नारळाचे तेल यांचा नियमित समावेश असतो. दुपारच्या जेवणात तो विविध भाज्यांसोबत चिकन, गोमांस किंवा मासे खातो. या आहारातून त्याला भरपूर प्रथिने, तंतुमय पदार्थ (फायबर), खनिजे आणि जीवनसत्त्वे मिळतात, जी सर्वोच्च दर्जाची कामगिरी करण्यासाठी आवश्यक ऊर्जा पुरवतात. रात्रीच्या जेवणातही तो याच प्रकारचा संतुलित आहार घेतो, मात्र वैविध्य राखण्यासाठी प्रथिनांचा स्रोत बदलतो.

### रोनाल्डोचा आवडता पदार्थ कोणता?

रोनाल्डोचा सर्वांत आवडता पदार्थ म्हणजे 'बकाल्हाऊ आ ब्राश'. पोर्तुगालच्या पारंपरिक खाद्यसंस्कृतीतील हा लोकप्रिय पदार्थ मीठात मुरवलेला कॉड मासा, अंडी आणि बारीक कापलेल्या बटाट्याच्या फ्राईज यांच्या मिश्रणातून तयार केला जातो. पोर्तुगालमध्ये कॉड माशापासून बनवल्या जाणाऱ्या हजारहून अधिक पारंपरिक पाककृतींपैकी हा पदार्थ सर्वाधिक प्रसिद्ध मानला जातो.

# घरच्या घरी मऊसूत पनीर कसे बनवाल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सरिताज किचनची 'घरच्या घरी मऊसूत पनीर' बनविण्याची सोपी रेसिपी आहे. ते जाणून घेऊ.

साहित्य

**फुल क्रीम दूध :** २ लिटर (म्हशीचे दूध वापरल्यास पनीर जास्त आणि मलाईदार होते)

**व्हिनेगर :** ५ टेबलस्पून (किंवा लिंबाचा रस)

**पाणी :** व्हिनेगर मिसळण्यासाठी अर्धा कप

**स्वच्छ सुती किंवा मलमलचे कापड :** १ [१] [२]

**कृती :**

**१) दूध उकळणे :** एका मोठ्या टोपात २ लिटर दूध गरम करायला ठेवा. दुधाला एक चांगली उकळी येऊ द्या.

**२) व्हिनेगरचे मिश्रण :** एका वाटीत ५ टेबलस्पून व्हिनेगर आणि थोडे पाणी एकत्र करून ठेवा. यामुळे व्हिनेगरचा तीव्र वास पनीरला येत नाही. [१] [२]

